स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 13–05–2016** रोजी **सायंकाळी 04–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| **2.** | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| **3.** | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| **4.** | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| **5.** | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| **6.** | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्या |
| **7.** | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्या |
| **8.** | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्या |
| **9.** | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्य |
| **10.** | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्य |
| **11.** | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| **12.** | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| **13.** | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| **14.** | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| **15.** | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. सौ. नयना गुंडे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 142</u>:– प्रभाग क्र. 40 गांधीबाग उद्यानात ''राष्ट्रीय संत तुकडोजी महाराज स्मारक'' तयार करण्यास्तव विविध कामे करण्याच्या एकत्रित रु. 39,50,000/– च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करुन निविदा मागविण्यास तसेच या कामाकरिता वास्तुविशारद मे. श्री. प्रियदर्शन नागपुरकर यांची म.न.पा.चे निर्धारित दरानुसार वास्तुठरावक सेवा घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 143</u>:— प्रभाग क्र. 40 ब गंजीपेठ येथील नाल्याचे आर.सी.सी. भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त 4 निविदापैकी मे. जितू कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा 0.1 टक्के प्रतिशत ने कमी दराची रु. 49,92,725/— रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 144</u>:— नागपूर मंजुर आराखाडया अंतर्गत प्रस्तावित डी. पी. रोड (EP ६९) नागपूर युनिव्हरसिटी वाचनालय नॉर्थ अंबाझरी रोड ते महाराजबाग चौक अमरावती रोड पर्यंत २४ मीटर रस्त्याच्या रूंदीकरणाचे कामास्तव डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाने सुचविलेल्या बदल लक्षात घेता तसेच मुळ प्राकलनामध्ये Curvature विकासीत करण्याचा समावेश करण्याकरीता रू.४५६०२७४४/— मुळ प्राकलन नुसार रू. ४,७४,२६,८५४/— चे निविदेश मंजुरी प्रमाणे दि. ०२.०९.२०१५ ला कंत्राटदार मे. एस. के. गुरूबक्षाणी यांना कार्यादेश देण्यात आल्याने व वाढीव काम करण्याची संमती कंत्राटदारांनी दर्शविल्याने रू. ५,५०,१५,५०७/— ( पाच कोटी पन्नास लक्ष पंधरा हजार पाचशे सात फक्त) च्या सुधारीत प्राकलनास मान्यते बाबत प्रश्न समितीने विचारात घेऊन तसेच,

१. स्थायी समिती ठराव क्र. ९५ दि. १९.०६.२०१५ अन्वये निवेदेस मंजुरी प्राप्त असुन कार्यादेश क्र. १३१/G दि. ०२.०९.२०१५ ला अन्वये देण्यात आलेला आहे.
२. वाहतुक बंद करण्याची परवानगी उशीरा मिळाल्याने तसेच मध्यंतरी नागपूर मधील क्रशर असोशिएशनचा संप झाल्यामुळे व कामाची व्याप्ती वाढल्यामुळे डांबरीकरणाचे काम वगळून इतर काम दि. ३१.०५.२०१६ पर्यंत व डांबरीकरणाचे काम दि. ३१/१२/२०१६ पर्यंत काम पूर्ण करण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 145</u>:— नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात एकूण ८ कोंडवाडे असून त्या ठिकाणी खालील जनावरे पकडण्याचे नविन सुधारीत दर येणे प्रमाणे :—

| | हत्ती | उंट | म्हैस, हेला मोठे वगार | घोडा, घोडी, खेचर, बैल, गाय, सांबर, सिंगरु, तटू, गोरा, गोरी. | गाढव | डूक्कर | गाईचे व म्हसीचे वासरु | बकरा, बकरी, मेंढा, मेंढी, कोकरु, करंडू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कोंडवाडा शुल्क | १०००/— | ६००/— | ५००/— | ५००/— | ४५०/— | १००/— | २००/— | १६०/— |
| प्रशासकिय दंड | ८०००/— | ६,३००/— | २०००/— | २०००/— | १,४००/— | १३५०/— | ११००/— | ३८०/— |
| खुराक खर्च ०८ तासाप्रमाणे | ८३०/— | ४३०/— | ३००/— | ३००/— | ६०/— | २००/— | १५०/— | ८०/— |
| वाहन खर्च | १००/— | १००/— | २००/— | २००/— | २०/— | २००/— | २५०/— | ८०/— |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पंजीयन शुल्क | २०/– | २०/– | ५००/– | ५००/– | २०/– | २००/– | २००/– | २००/– |
| आवेदन फार्म फी | १०/– | १०/– | ५००/– | ५००/– | १०/– | २००/– | २००/– | २००/– |
| हमी पत्राचा नमुना | २०/– | २०/– | ५००/– | ५००/– | २०/– | ५००/– | २००/– | ५००/– |
| प्रतिज्ञा पत्राचा नमुना | २०/– | २०/– | ५००/– | ५००/– | २०/– | ४००/– | २००/– | ४००/– |
| एकूण रक्कम | १०,०००/– | ७,५००/– | ५०००/– | ५०००/– | २,०००/– | ३,१५०/– | २५००/– | २०००/– |

उपरोक्त दर लागू केल्यास शहरातील मोकाट जनावरांमुळे वाहतुकीला होणारा अडथळा दूर करण्यास मदत होईल करीता दरवाढीबाबतचा प्रस्ताव समितीने विचारात घेऊन स्थायी समितीच्या सदस्यांची दरवाढीच्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी चार सदस्यीय उपसमिती गठित करण्यात येते. या समितीचे सदस्य खालील प्रमाणे

१. श्री. जगदीश ग्वालबंशी – सदस्य
२. श्री. सुरेश जग्याशी – सदस्य
३. श्री. मुन्नाजी पोकुलवार – सदस्य
४. श्री. राजु नागुलवार – सदस्य

या समितीने तीन दिवसाच्या आत अहवाल स्थायी समितीस सादर करावा यास मंजुरी प्रदान करते. विषय कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 146ः–</u> महाल रोगनिदान केंद्र येथील फिजिओथेरेपी विभाग पी पी.पी. तत्वावर साकेत ऑर्थोपेडीक अप्लॉयन्सेस सेंटर, रामदासपेठ, नागपूर यांना म.न.पा.ने नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार चालविण्यास सहमत आहे. सदर प्रस्तावाला मा.आयुक्त यांनी पृष्ठ क्र. 39 नुसार मंजुरी प्रदान केली आहे. सदर प्रकल्प खालील नमुद म.न.पा.च्या मुख्य अटी व शर्तीनुसार चालविण्याकरीता स्थायी समितीची मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तसेच,

1) सदर प्रकल्पाला महाल रोगनिदान केंद्र येथील 2704.63= 2705 चौ.फुट जागा तीन वर्षाकरीता देण्यात येईल व महानगरपालिका एक रुपया प्रति चौ.फुट मासीक शुल्क संबंधित संस्थेकडुन (साकेत ऑर्थोपेडीक अप्लॉयन्सेस सेंटर, रामदासपेठ, नागपूर) आकारेल.
2) महानगरपालिका उपकरणाचा मोबदला म्हणुन मासीक शुल्क रुपये 5000/–(रुपये पाच हजार) संबंधित संस्थेकडुन आकारेल.
3) संबंधित संस्था विभागुन देण्यात आलेला विद्युत बिलाचा खर्च वहन करेल.
4) संबंधित संस्था अंपगाकरीता लागणा–या साहित्य विक्रिच्या १०% रक्कम म.न.पा.ला देईल.
5) फिजिओथेरेपी केंद्र सकाळी 8.00 ते रात्री 8.00 वाजेपर्यंत सुरु राहील.
6) संबंधित संस्था जनतेस आपली सेवा म.न.पा.च्या दरात देईल. तसेच म.न.पा.च्या कर्मचा–यांना व पदाधिका–यांना मोफत सेवा देईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 147</u>:— नव्याने मनपा हद्वाढ मौजा नरसाळा—हुडकेश्वर करिता मलनिस्सारणाचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत व याअंतर्गत घेण्यात येणाऱ्या प्रकल्पावर प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागाराची नियुक्ती करण्यास्तव मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये निम्नतम निविदाकार M/s DRA Consultant Pvt. Ltd. Nagpur यांचे खालीलत दरास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितने विचारात घेऊन तसेच,

**Consultancy Services for Preparation of Detailed Project report (DPR) & Pre Tender Activity :-**

| Sr. No | Description | Base Cost | Fees in % of Base Cost | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Project Cost (in Crores) | Consultant Fees | | Fees Payable to the Consultant |
| | | | | In % | Min. Fees (in Rs. Lakhs) | |
| 01] | "Consultancy Services for Preparation of Detailed Project Report (DPR) and Pre-Tender Activity for Sewerage System of Hudkeshwar & Narsala of Nagpur City" | Total Accepted Cost of the Project | Rs. 0.00 to 2.50 | 2.00% | --- | --- |
| | | | Rs. 2.50 to 5.00 | 1.75% | 5.00 | Rs. 5.00 lakhs or 1.75% of the Project Cost whichever is more. |
| | | | Rs. 5.00 to 10.00 | 1.50% | 8.75 | Rs. 8.75 lakhs or 1.50% of the Project Cost whichever is more. |
| | | | Rs. 10.00 to 25.00 | 1.00% | 15.00 | Rs. 15.00 lakhs or 1.00% of the Project Cost whichever is more. |
| | | | Rs. 25.00 to 50.00 | 0.75% | 25.00 | Rs. 25.00 lakhs or 0.75% of the Project Cost whichever is more. |
| | | | Rs. 50.00 to 75.00 | 0.60% | 37.50 | Rs. 37.50 lakhs or 0.60% of the Project Cost whichever is more. |
| | | | Rs. 75.00 to 100.00 | 0.50% | 45.00 | Rs. 45.00 lakhs or 0.50% of the Project Cost whichever is more. |
| | | | More than Rs. 100.00 | 0.50% | 50.00 | 0.50% |

**B] Project Management Consultant (PMC) :-**

| Sr. No. | Item | Unit | Quoted rate in Percentage of approved cost |
|---|---|---|---|
| 01] | "Project Management Consultant (PMC) for Sewerage System of Hudkeshwar & Narsala of Nagpur City" | % of the approved cost of work | **3% (Three Percent only)** |

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 148</u>:— नागपूर शहराकरिता सिमेंट कॉक्रिंट रोड फेज —II अंतर्गत पॅकेज—V अंतर्गातील 1) 1—उंटखाना रोड—मेडीकल चौक ते अशोक चौकापर्यंत 2) 21—रिज रोड ते आंबेडकर पुतळा (रामेश्वरी रोड) पर्यंतचा हा रस्ता सिमेंट कॉक्रिंट पर्यंतचा सिमेंट कॉक्रीट रस्ता तयार करण्याच्या कामास्तव एकूण प्राप्त 04 पात्र निविदापेकी मे. आर.पी.एस इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 12.00 टक्के कमी दराची रुपये 10,23,02,959 ⁄— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 149</u>:— नागपूर शहराकरिता सिमेंट कॉक्रिंट रोड फेज —II अंतर्गत पॅकेज—VII अंतर्गातील 1) रस्ता क्र. 10 (अ) — संजूबा हायस्कूल ते महाकाळकर सभागृह पर्यंत रस्ता. 2) रस्ता क्र. 10 (ब) — महाकाळकर सभागृह ते गजानन शाळा टी पॉईंटपर्यंत रस्ता. 3) रस्ता क्र. 34 — सिध्देश्वर सभागृह ते राजकमल चौक पर्यंत रस्ता. 4) रस्ता क्र. 39 — अयोध्यानगर ते बसवेश्वर पुतळा पर्यंतचा रस्ता. सिमेंट कॉक्रीट रस्ता तयार करण्याच्या कामास्तव एकूण प्राप्त 04 पात्र निविदापेकी मे. आर.पी.एस इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 13.00 टक्के कमी दराची रुपये 14,74,04,936/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 150</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर